आधुनिक विचारांचे

# वर्तमान




आरक्षणाचे जनक, लोकराजा
**छत्रपती राजर्षी शाहू महाराज**
यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांना
विनम्र अभिवादन!
: संपादक


बीड । मंगळवार, २२ जून २०२१ । वर्ष : ३ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : ३५ । पाने : ४ । मूल्य २ ₹




# हिंदुत्व हेच शिवसेनेसाठी राष्ट्रीयत्व

## शिवसेनेच्या वर्धापनदिनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे गरजले

▶ प्रतिनिधी

मुंबई : हिंदुत्व हा शिवसेनेचा श्वास असून सत्तेसाठी कोणत्याही परिस्थितीत लाचार होणार नाही. त्याचबरोबर उगाच कोणाची पालखीही शिवसेना वाहणार नाही. स्वाभिमानाने आणि स्वत:च्या पायावर खंबीरपणे पुढची वाटचाल शिवसेना करेल, असे प्रतिपादन शिवसेना पक्षप्रमुख तथा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या वर्धापनदिन कार्यक्रमात केले.

शिवसेनेच्या ५५ व्या वर्धापनदिनानिमित्त उद्धव ठाकरे यांनी राज्यभरातील शिवसैनिकांना दूरचित्रसंवादाद्वारे संबोधित केले. गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीमधील मित्रपक्ष काँग्रेस वारंवार निवडणुका स्वबळावर लढण्याची भाषा करीत असल्याच्या प्रकाराचा उद्धव ठाकरे यांनी समाचार घेतला. तसेच सत्ताप्राप्तीसाठी आतुर विरोधकांवरही त्यांनी टीकास्त्र सोडले. मराठी माणूस आणि महाराष्ट्राच्या न्याय्यहक्कांसाठी शिवसेनेचा जन्म झाला. स्वबळ हे केवळ निवडणुकीपुरते असत नाही. स्वबळ म्हणजेच आत्मबल आणि आत्मविश्वासाच्या जोरावर शिवसेनेने आधी मराठी माणसाच्या हक्काची व नंतर हिंदुत्वाची लढाई लढली.

सत्तेसाठी शिवसेना लाचार होणार नाही आणि उगाच कोणाची तरी पालखीही वाहणार नाही. स्वाभिमानाने आणि स्वत:च्या पायावर खंबीरपणे शिवसेना पुढची वाटचाल करेल, किंबहुना हेच शिवसेनेचे ब्रीद आहे, असा अप्रत्यक्ष इशारा उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीमधील मित्रपक्ष आणि विरोधकांना दिला.शिवसेनेने आजवरच्या वाटचालीत अनेकांचे रंग–अंतरंग पाहिले आहेत. अनेकजण आजकाल स्वबळाची घोषणा देत आहेत. स्वबळाच्या म्हणजेच आत्मबलाच्या आधारेच शिवसेनेने मराठी माणसाला न्याय मिळवून दिला. स्वबळ हा आमचा हक्कच आहे. अन्यायाविरोधात लढण्यासाठी स्वबळ हवेच. संकटावर स्वबळाने चालून जाईल तोच शिवसैनिक हे समजावून सांगितले, असेही ठाकरे यांनी नमूद केले.


बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड


# माजलगाव रेशनमाफियांचे केंद्र

## महसूल प्रशासनाचा कानाडोळा; आणखी किती साठे सापडणार?

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तब्बल तीनशे क्विंटल रेशनचे धान्य काळ्याबाजारात विक्रीसाठी जात असताना पोलीसांनी जप्त केले. या कारवाई नंतरही रेशनच्या धान्याचे साठे गोडाऊनमध्ये सापडत असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. दरम्यान, माजलगाव शहर हे रेशनमाफियांचे केंद्र बनत चालले असून याकडे प्रशासनाने मात्र अक्षम्य कानाडोळा केल्याने जनतेतून संताप व्यक्त होत आहे. आणखी किती रेशन धान्याचे साठे सापडणार? असा सवाल जनसामान्य विचारत आहेत.

माजलगाव तालुक्यात धान्याचा मोठा काळाबाजार होत असल्याची माहिती गेल्या बुधवारी पोलिसांना मिळाली होती. काळ्या बाजारात विक्रीसाठी जाणारा रेशनचा गहू–तांदळाच्या तीनशे क्विंटल धान्याचा टेम्पो पोलिसांनी पकडला परंतु हे धान्य ओळखू येत नसून ते तपासणीसाठी कृषी विद्यापीठात पाठवावे असे म्हणत गुन्हा नोंद करण्यास टाळाटाळ झाली, या प्रकरणी महसूल प्रशासन चालढकल करत असल्याने अखेर गुरुवारी रात्री पोलिसांनीच दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, यातील मुख्य सूत्रधार बाहेरच असल्याची चर्चा होताना आहे. यामुळे त्या तीनशे क्विंटल धान्याचे गौडबंगाल काय? असा सवाल माजलगावकरांना पडला आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार, काळ्या बाजारात विक्रीसाठी जाणारा रेशनच्या गहू–तांदळाच्या तीनशे क्विंटल धान्याचा टेम्पो बुधवार दिनांक १७ जून रोजी पोलिसांनी पकडला होता. पोलिस उपनिरीक्षक अविनाश राठोड, जयराम भटकर, गणेश तळेकर, बाळासाहेब डापकर, विनायक अंकुशे यांच्या पथकाने पाठलाग करून बायपास रोडवर संबंधित टेम्पोची तपासणी केली असता गहू व तांदूळाचे ६१० कट्टे शासकीय धान्याचे शिक्के असलेले आढळून आले. याबाबत पुरवठा अधिकारी सैंदुरामराजे कुंभार, पुरवठा निरीक्षक रविंद्र पळसकर आणि मंडळ अधिकारी कृष्णा पुराणिक यांनी पंचनामा केला, परंतु पुढे हे धान्य शासकीय आहे की नाही याची खात्री करण्यासाठी कृषी विद्यापीठाकडे पाठवावे असे पत्र पोलिसांना देण्यात आले. त्यामुळे यामागचे नेमके गौडबंगाल काय? असा सवाल उपस्थित माजलगावकरांना पडला आहे. महसूलच्या या पळकाढू धोरणाने धान्य माफियासोबत मिलीभगत असल्याची चर्चा होताना दिसत आहे. पोलिसांनी पकडलेल्या त्या सर्व ६१० गोण्या शासकीय असल्याचे उघड असताना महसूल विभागाने पोलिसांसमोर तांत्रिक पेच निर्माण करत गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे पोलिसांनी काळ्या बाजारात धान्य घेऊन जाणाऱ्या इमरान मुस्तफा खान व आयशर टेम्पो चालक (एमएच–२२, एएन.२१७५) शेख नसीमुद्दीन या दोघांवर जीवनाश्यक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, हे दोन छोटे मासे पोलिसांच्या हाती लागले असले तरी बड्या माशाच्या शोधात पोलीस प्रशासन कामाला लागले आहे.

### अरेरे! गरिबांच्या अन्नात माती कालवू नका

माजलगाव शहरात रेशनधान्याचा मोठ्या प्रमाणात साठा सापडल्याने खळबळ उडाली आहे. माजलगाव शहरात रेशनमाफियांनी उच्छाद मांडल्याचे दिसत आहे. या प्रकरणाची दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी जनतेतून होत आहे. अरेरे! गरिबांच्या अन्नात माती कालवू नका अशा मार्मिक प्रतिक्रियाही जनसामान्य माजलगावकरांमधून उमटत आहेत.

#### पोलीस जागे; तहसिलदार झोपेत

माजलगाव शहर आणि तालुक्यात रेशनच्या धान्याचा काळाबाजार वाढला असला तरी येथील तहसिलदारांना याचे काही घेणे–देणे नसल्याचे दिसून येते. मात्र येथील पोलीस प्रशासन कर्तव्य बजावत रेशनमाफियांच्या मुसक्या आवळत आहेत. त्यामुळे पोलीस जागे, तहसिलदार झोपेत अशा संतप्त प्रतिक्रिया माजलगाव परिसरातून उमटत आहेत.



#### 'वर्तमान'कडे भक्कम पुरावे

माजलगाव शहरात बोकाळलेल्या रेशन धान्याच्या काळाबाजार प्रकरणी महत्वाची पुरावे 'वर्तमान'च्या हाती लागले आहेत. एका गोडाऊनमध्ये जावून धान्याचा साठा स्टिंग ऑपरेशनद्वारे वर्तनमानने टिपला आहे. दरम्यान, जनतेनेही आपल्याकडे असलेली माहिती, पुरावे 'वर्तमान'कडे पाठवून देवून रेशनधान्याचा काळाबाजार रोखण्याच्या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन वर्तमान माध्यम समुहाने केले आहे.

# केंद्राच्या महागाईला राज्य सरकारची संमती : साळवे

▶ प्रतिनिधी

माजलगाव :: पेट्रोल, डिझेल सह घरगुती व व्यावसायिक वापरासाठी वापरल्या जाणाऱ्या गॅस या आवश्यक झालेल्या इंधनाच्या दरात केंद्र सरकारकडून दिवसेंदिवस वाढतच होत असल्याने या सर्व वाढत्या दरांचा परिणाम सर्वच जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतीत झाला आहे आणि त्या सर्व प्रकारच्या महागाई बाबतीत केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणाला राज्य सरकार संमती देत आहे. कारण राज्य सरकारच्या अधिकारात असलेल्या करांची कपात करण्यासाठी निर्णय घेतला जात नसल्याने महागाईला दोन्ही सरकार जबाबदार आहेत, असे मत वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रवक्ते धम्मानंद साळवे यांनी व्यक्त केले आहे. इंधन दरवाढीने इतर सर्व प्रकारच्या वस्तुंमध्ये दरवाढ झाल्याने केंद्र व राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांचा निषेध व्यक्त करून दरवाढी तातडीने मागे घेण्याचे निवेदन सोमवार दिनांक २१ जून रोजी माजलगावच्या तहसिलदार यांना धम्मानंद साळवे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा सहसचिव अंकुशराव जाधव, उपाध्यक्ष भारत तांगडे, जेष्ठ नेते विठ्ठल पंडीत सह युवानेते प्रशांत बोराडे, शत्रुघ्न कसबे, राजेश विघ्ने यांनी दिले. यात म्हटले आहे की, महागाई वाढल्याने सामान्य माणसांची आर्थिकदृष्ट्या लुटमार करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार जबाबदार असल्याचा आरोप केला करून संबंधित इंधनाची दरवाढ तात्काळ कमी करण्याची मागणीही निवेदनात केली आहे.



# राज्यात कोरोनाबाधितांपेक्षा दुप्पट रूग्ण कोरोनामुक्त

▶ प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील कोरोना संसर्गाचे प्रमाण कमी होताना दिसत आहे. दररोज आढळणाऱ्या कोरोनाबाधितांच्या तुलनेत अनेक दिवसांपासून कोरोनामुक्त होत असलेल्यांची संख्या अधिक आढळून येत आहे. राज्यात सोमवारी दिवसभरात आढळलेल्या कोरोनाबाधितांपेक्षा दुप्पट अधिक रूग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. तर, राज्याचा रिकव्हरी रेट देखील वाढला आहे. राज्यभरात सोमवारी ६ हजार २७० नवीन कोरोनाबाधित आढळले असून, १३ हजार ७५८ रूग्ण कोरोनातून बरे झाले आहेत.

# तेलगावला या, 'बीग बॉस'च्या घरात

## ग्रामीण हेअरस्टाईलला शहरी टच; तरूण उद्योजक बलराज राऊत यांची संकल्पना

▶ भगीरथ तोडकरी

तेलगाव : ग्रामीण भागात हेअरस्टाईलला शहरी टच देवून नवतरूणांना हव्या त्या स्टाईल उपलब्ध करून देणारे तेलगाव येथील बीग बॉस हे सलून जिल्हाभरात चर्चेचा विषय ठरले आहे. नवतरूणांना खुणावणारे बीग बॉस हे सलून तेलगावस्थित शंकर कॉम्लेक्स धारूर रोड येथे आहे.



कल्पक दृष्टी असलेले बीग बॉसचे संचालक बलराज राऊत आपल्या हटके स्टाईलमुळे नवतरूणांच्या गळ्यातील ताईत बनत चालले आहेत. बीग बॉस नाव धारण करून स्वतःचा ब्रँण्ड विकसित करण्यावर बलराज राऊत यांचा भर आहे. पुणे, मुंबई येथील सर्व्हिस तेलगाव सारख्या ठिकाणी देणे म्हणजे मोठी रिस्क होती. मात्र प्रोफेशनल सलून व्यवसाय काय असतो. याची ओळख बीग बॉसच्या माध्यमातून बलराज राऊत तरूणांना देतात. बीग बॉस या नावाबद्दल बोलताना बलराज राऊत म्हणाले, बीग बॉस हे नाव जरा हटके आणि दम असलेले नाव आहे. त्यामुळे पत्नी ज्योती आणि मी दोघांनी मिळून बीग बॉस हे नाव देण्याचे निश्चित केले. ग्रामीण भागात बीग बॉस हा ब्रँण्ड होत आहे, असेही बलराज राऊत म्हणाले. आजच्या नव्या पिढीकडे बघून बीग बॉस संकल्पना अंमलात आणली आणि ग्राहकांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात मिळत आहे. त्यामुळे आमची संकल्पना नवतरूणांना भावली, असल्याचेही राऊत म्हणाले. ग्रामीण भागात अत्याधुनिक सुविधा देणारे सलून उभा करणे म्हणजे माझ्यासाठी दिवास्वप्न होते. पण माझ्या स्वप्नांना बळ देण्याचे काम गोरख सोनटक्के यांनी केले. लॉकडाऊनच्या काळात सलून सुरू झाले त्यामुळे व्यवसायाला मोठा फटका बसला. तरीही आता लॉकडाऊन शिथील झाल्याने ग्राहकांचा रिस्पॉन्स वाढत आहे. तरूण व्यवसायात उतरण्याऱ्या तरूणांनी केवळ दाढी आणि कटींगमध्ये गुंतून न जाता इतर सेवा द्याव्यात, असेही बलराज राऊत म्हणाले. बीग बॉसचे वैशिष्ट्ये सांगताना बलराज राऊत म्हणाले, हेअर स्पा ही मशीन उपल्बध केली असून तरूणांच्या आकर्षणाचा केंद्र ठरत आहे. पुणे, मुंबई येथील सेवा तेलगाव सारख्या ग्रामीण भागात मिळत असेल तर ग्राहक हक्काने का येणार नाहीत असाही विश्वास बीग बॉसने दिला. ज्यांना हेअरस्टाईल आवडते त्यांनी बीग बॉसला भेट द्यावी असा सल्ला राऊत देतात. बीग बॉसमध्ये नववधू आणि वरांच्या मेकअपची सुविधा उपलब्ध आहे, अशीही माहिती राऊत यांनी दिली.



### 'बीग बॉस'साठी पुण्यात ३ वर्षे प्रशिक्षण

ग्रामीण भागात नवतरूणांना डोळ्यासमोर ठेवून बीग बॉस हे प्रोफेशनल सलून सुरू करण्यासाठी तीन वर्षे पुण्यात वेगवेगळ्या नामांकित सलूनमध्ये प्रशिक्षण घेतले. यात जावेद हबीबचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. बीग बॉसच्या पुढील वाटचालीत दिंद्रुड आणि वडवणी येथे शाखा सुरू करण्याचा आपला मानस असल्याचेही बलराज राऊत म्हणाले.

## फास्टट्रॅकन्यूज

### जिल्ह्याला १६ हजार लस उपलब्ध; लसीकरण सुरू

बीड : गेल्या महिनाभरापासून बंद असलेले लसीकरण सोमवारी जिल्ह्याच्या ९८ केंद्रांवर सुरू झाले असून यामध्ये ६८ केंद्रांवर दुसरी लस तर ३० केंद्रांवर पहिली लस दिली जात आहे. जिल्हा प्रशासनाकडे १६ हजार डोस उपलब्ध झाले आहेत. सोमवारी ३० ते ४४ वयोगटातील नोंदणीकृत नागरिकांना लस देणे सुरू असून ४४ पेक्षा अधिक वयाच्या नागरिकांना दुसरा लस देण्यात येत आहे. शिक्षणासाठी अथवा अन्य कारणासाठी देशाबाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह नागरिकांना घरपोच लसीकरण मोहीम जिल्हा प्रशासनाने हाती घेतली आहे. जिल्ह्यात वाढता कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जलदगतीने लसीकरण होणे गरजेचे आहे. प्रशासनही लस उपलब्ध झाल्याबरोबर तेवढ्याच्या ताकतीने लसीकरण मोहीम हाती घेताना दिसून येत आहे.




### रोटरीच्या अध्यक्षपदी डॉ.प्रशांत पाटील यांची निवड



माजलगाव : मागील अनेक दशकांपासुन सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहून कार्य करत असलेल्या रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या अध्यक्षपदी सिद्धीविनायक अर्बनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.प्रशांत पाटील यांची सर्वसंमतीने निवड करण्यात आली आहे. डॉ.पाटील यांनी आजवर केलेल्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून ही निवड करण्यात आल्याचे बोलले जात आहे. डॉ.पाटील यांनी यापूर्वी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या सेक्रेटरी पदी अतिशय उत्कृष्ट असे कार्य केलेले आहे.

### माजलगावात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा

माजलगाव : येथील भा.शि.प्र संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयासह श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात देखिल आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. क्रीडा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने योगदिनाचा कार्यक्रमात आयोजित करण्यात आला. आपल्या पूर्वजांनी योगासने, प्राणायाम ही अतिशय अनमोल देणगी आपणास दिली आहे. त्याचे जतन करणे आणि स्वतःच्या सवयीचा भाग बनवणे हे कोरोनाच्या ह्या संकट काळात आवश्यक असून आपण जर रोजच्या दैनंदिन वेळापत्रकामध्ये योगासनांचा समावेश केला तर रक्तदाब, मधुमेह, ताण तणाव या समस्या पूर्णतः दूर होतील. आणि आपली रोगप्रतिकारक क्षमता वाढण्यास मदत होणार असल्याचे मत मान्यवरांनी मनोगातात व्यक्त केले.

## संपादकीय

# कोरोनामुक्तीसाठी प्रयत्नांची गरज

देशात कोरोना लढा लढताना केंद्र सरकार सर्व पातळ्यांवर प्रयत्नशील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडे देशाला उद्देशून केलेल्या भाषणात १८ वर्षावरील सर्व वयोगटांतल्या नागरिकांचं २१ जूनपासून केंद्र शासनाद्वारे मोफत कोरोनाविरोधी लसीकरण करण्यात येणार असल्याची घोषणा केली आणि देशातल्या ८० कोटी लोकांना नोव्हेंबरपर्यंत मोफत धान्यपुरवठा चालू ठेवण्यात येईल, अशी ग्वाही दिली. त्याचबरोबरच भारत बायोटेकच्या कोवॅक्सिन व्यतिरिक्त भारतीय बनावटीच्या दोन लसी तयार होत असल्याचा दिलासादेखील दिला. याआधी सर्वोच्च न्यायालयात करण्यात आलेल्या याचिकेला उत्तर देताना ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत भारतातली लसीकरण प्रक्रिया जवळपास पूर्ण झालेली असेल, असे आश्वासन केंद्राने दिले होते. पंतप्रधान मोदी ७ जून रोजी देशाला संबोधित करत असताना कोरोनाबाधित रूग्णांच्या वाढीचा दर मागील दोन महिन्यांतल्या वाढीपेक्षा कमी असणे ही आशादायक बाब होती. याआधी लसीकरणासाठी ५० टक्के केंद्र, २५ टक्के राज्य आणि २५ टक्के खासगी आस्थापना अशी विभागणी करण्यात आली होती; परंतु आता मात्र राज्यांचा वाटा केंद्राने घेतल्यामुळे संपूर्ण लसीकरणाची जबाबदारी एक प्रकारे केंद्राची असणार हे उघड झाले आहे. मोदींच्या या ऐतिहासिक भाषणावर अर्थातच ममता बॅनर्जी यांनी नाराजी व्यक्त केली असली तरी केरळ, छत्तीसगड आणि पंजाब या (विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या) राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी मात्र समाधान व्यक्त केले हे विशेष. केंद्र सरकारच्या या नव्या पवित्र्यामागे नेमके काय राजकारण आहे, हे समजून घेणे उत्सुकतेचे ठरणार आहे. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी २४ फेब्रुवारी रोजी पंतप्रधानांना पत्र लिहून पश्चिम बंगाल आपल्या राज्यासाठी लागणारी लस स्वत: खरेदी करणार असून यासाठी संबंधितांची परवानगी मिळवून द्यावी, अशी विनंती केली. त्यानंतर त्यांनी १८ एप्रिलला पंतप्रधानांना पुन्हा पत्र लिहून २४ फेब्रुवारीच्या पत्राची आठवण करून देत आपले राज्य लस खरेदी करायला तयार आहे, अशी भूमिका घेतली. ममता बॅनर्जीच्या या पत्रानंतर १८ मार्चला दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनीदेखील लसीकरणाच्या खरेदीचं केंद्रीकरण करावं, अशी भूमिका मांडली, तर राहुल गांधी यांनी राज्यांना बायपास करून लस खरेदी का केली जात आहे, असा प्रश्न उपस्थित केला. ओडिशाच्या मुख्यमंत्र्यांनीही अशाच प्रकारची मागणी लावून धरली. विरोधी पक्षांचे राज्यसभेतले उपनेते आनंद शर्मा यांनी हा देश फेडरल राजसत्ताक असल्याची जाणीव करून देताना आरोग्य हा राज्याचा विषय असल्यामुळे घटनात्मक जबाबदारी म्हणून राज्यांना खरेदीचे अधिकार दिले जावेत, अशी मागणी केली.राज्यांनी लसखरेदीच्या विकेंद्रीकरणाची मागणी अगदी जोरात लावून धरली आणि त्यातूनच ५० टक्के केंद्र सरकार, २५ टक्के राज्य सरकार आणि २५ टक्के खासगी आस्थापना अशी नवी रचना अस्तित्वात आली. राज्यांना अशी परवानगी देताना अशा प्रकारच्या खरेदीची कोणतीही व्यवस्था राज्यांकडे नसल्याचे लगेचच लक्षात आले. लसखरेदीसाठी लागणारी यंत्रणा उभी करण्यात राज्य सरकार सपशेल उघडी पडली. काही राज्यांच्या जागतिक निविदांना अत्यंत थंडा प्रतिसाद मिळाला. अवघ्या तीन आठवड्यांत संपूर्ण दिल्लीचे लसीकरण करू, अशा बढाया मारणारे अरविंद केजरीवाल अक्षरश: तोंडावर आपटले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी देखील ८ मे रोजी पंतप्रधानांना पत्र लिहून तिसरी लाट येण्याची शक्यता असल्याने राज्यांना तातडीने लसखरेदीचे अधिकार देण्यात यावेत, अशी मागणी केली. अर्थातच तीन आठवडे झाल्यानंतरही राज्याकडून कोणतीही सकारात्मक पावले टाकल्याचे समोर येत नव्हते. बहुतांश प्रमुख राजकीय नेत्यांनी १२ मे रोजी पंतप्रधानांना पत्र लिहून आता लसीची खरेदी केंद्रामार्फत करा आणि वितरण मोफत करा, असा घुमजाव करणारा पवित्रा घेतला. त्यांच्या विकेंद्रीकरणाच्या आधीच्या वल्गना हवेत विरून गेल्या, हे तितकंच खरे. यात अर्थातच महाराष्ट्राचाही समावेश आहे. या सगळ्यात राजस्थान, पंजाब यासारख्या राज्यांमध्ये झालेली लसीची नासाडी आणि पंजाबसारख्या राज्यात तर केंद्राकडून मोफत लस मिळवून खासगी आस्थापनांना चढ्या किमतीत विकण्याचे अनेक प्रकार पुढे आले. मेच्या अखेरीस अनेक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी केंद्रानेच एकत्रितरीत्या लस खरेदी करावी, अशी आग्रही मागणी लावून धरली.आज आपण दरदिवशी ३२ ते ३३ लाख लोकांचे लसीकरण करत आहोत. म्हणजेच, संपूर्ण कतार देशाच्या लोकसंख्येइतक्या लोकांचे लसीकरण आपण एका दिवसात करत आहोत. मे महिन्यात जवळपास साडेसहा कोटी लोकांचे लसीकरण केले. म्हणजेच लोकसंख्येच्या दृष्टीने संपूर्ण इंग्लंडच्या आकाराच्या देशाचे लसीकरण आपल्याकडे झाले, असे म्हणायला हरकत नाही. अर्थात या पुढच्या काळात भारताच्या सर्व नागरिकांचे दोनदा लसीकरण करायचे असेल, तर ते काम अतिशय जोखमीचे, जिकिरीचे आणि कष्टाचे आहे. याचे कारण म्हणजे दिवसाला जवळपास ९५ लाख लोकांच्या लसीकरणाचा वेग आणि सातत्य आपल्याला राखावे लागेल आणि हे काम आता मोदींनी स्वखुशीने शीरावर घेतले आहे. खरे तर राज्यांनी केंद्रभूत खरेदीची व्यवस्था आणावी, असे सांगितल्यानंतर त्यांच्या राजकारणाला मोदी राजकार उत्तर देऊ शकले असते; परंतु, सद्यकाळातले आव्हान पेलायचे ठरवले हे त्यांचे वैशिष्ट्य. आता या पुढच्या काळात त्यांना राज्यांकडून सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा बाळगू या आणि देश लवकरात लवकर कोरोनामुक्त करूया, या संकल्पनेसाठी प्रयत्नांची गरज आहे.

# रूग्णसेवेचा वारसा जपणारा पत्रकार

**शिवसेनेच्या वैद्यकिय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांचा १५ जून वाढदिवस. त्यांच्या संकल्पनेतून उभ्या राहिलेल्या शिवसेनेच्या मदत कक्षासोबतच मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाकडून आजपर्यंत लाखो रूग्णांना उपचारासाठी निधी मिळालाय. त्यातल्या अनेकांचे प्राण वाचलेत. पत्रकारितेतली चांगल्या पगाराची नोकरी सोडून रूग्णसेवेला वाहून घेतलेले मंगेश चिवटे यांच्याविषयी रणवीर राजपूत यांनी लिहीलेला हा विशेष लेख वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.**



व्यक्तीविशेष

**रणवीर राजपूत**

गरिबांनी आजारी पडूच नये अशी परिस्थिती आज आलीय. गंभीर आजारांवर दीर्घकालीन उपचार आणि महागड्या शस्त्रक्रिया करू शकतील, एवढा पैसाच त्यांच्याकडे नसतो. त्यामुळे चांगल्या उपचारपद्धती उपलब्ध असूनही अनेकांना आपले जीव गमवावे लागतात. यावर ठोस तोडगा काढून निर्धन लोकांचे जीव वाचवण्यासाठी मुंबईत बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची निर्मिती झाली. या शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख आहेत मंगेश चिवटे. गोरगरीब, निराधार लोकांना मायेचा ओलावा देऊन देवाने दिलेले माणसाचा जन्म सार्थकी करावा ही त्यांच्या आईवडीलांची शिकवण. तोच जीवनमंत्र आत्मसात करून चिवटे यांनी वैद्यकीय सेवेची पालखी खांद्यावर घेतलीय. १५ जून हा त्यांचा जन्मदिवस.

**मुख्यमंत्री मदत कक्षाची स्थापना**

२०१४ ला माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सरकार स्थापन झाले. रूग्णसेवेची आवड असलेले पत्रकार मंगेश चिवटे यांनी फडणवीसांकडे राज्यातल्या गरिबांना महागड्या शस्त्रक्रिया उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष' स्थापन करण्याची संकल्पना मांडली. त्यानंतर सातत्याने त्याचा पाठपुरावा केला. १७ मार्च २०१५ पासून या योजनेमार्फत गरजू पेशंटना निधी देण्यास सुरवात झाली. आजवर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून सुमारे ५३ हजाराहून अधिक रूग्णांवर शस्त्रक्रिया आणि वैद्यकीय उपचार करण्यात आलेत. चिवटे यांच्या प्रयत्नातून उभारले गेलेले हे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष' गोरगरीब रूग्णांसाठी संजीवनी ठरलंय.

**सेवेचा वारसा**

चिवटे यांचे आजोबा साथी मनोहरपंत चिवटे हे स्वातंत्र्यसैनिक होते. सोलापुरातल्या करमाळ्याचे पहिले नगराध्यक्ष म्हणूनही त्यांना ओळखले जाते. करमाळ्यातल्याच महात्मा गांधी विद्यालयात मंगेश चिवटे यांचे शालेय शिक्षण झाले. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या एसपी कॉलेजमधे. मराठी या विषयात एमए करून बीएड केले. त्यानंतर पत्रकारिता विषयात पदवी संपादन केली. एवढे शिक्षण घेऊनही ते थांबले नाहीत. मुंबईतल्या केसी कॉलेजमधून वकिलीची दोन वर्ष पूर्ण केलीयत. सध्या ते शेवटच्या वर्षाला आहेत. गडकिल्ल्यांचा प्रवास करून त्या विषयात संशोधन करण्याचा त्यांना छंद आहे. आतापर्यंत त्यांनी ५० गडकिल्ल्यांना भेटी देऊन झाल्यात. पन्हाळगड ते पावनखिंड हा प्रवास गेल्या १० वर्षापासून ते सातत्याने करतायत.

**मुख्यमंत्र्यांकडून सत्कार**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या यशस्वी घोडदौडीनंतर याच धर्तीवर शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष स्थापन करता येईल अशी संकल्पना मंगेश चिवटे यांनी मंत्री एकनाथ शिंदेंसमोर मांडली. शिंदे साहेबांना ही संकल्पना मनस्वी पटली. लगेच मंजूरही झाली. त्यानंतर लगेचच १७ नोव्हेंबर २०१७ ला ठाण्यातल्या कोपरीमधे बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचीही स्थापना झाली. कक्षाची रूपरेषा आवडल्याने उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या सूचनेनुसार १७ नोव्हेंबर २०१८ ला दादरच्या शिवसेना भवनात वैद्यकीय मदत कक्षाचा शुभारंभ झाला. तेव्हा चिवटे यांचा सत्कारही झाला.

**मुलाखत घेणाऱ्याची मुलाखत**

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षात काम करण्याआधी चिवटेंनी स्टार माझा, जय महाराष्ट्र, साम टिव्ही, आयबीएन लोकमत अशा प्रसिद्ध न्यूज चॅनेलमधे काम केले होते. त्यातून मिळालेल्या अनुभवाच्या जोरावर चिवटेसरांनी रूग्णसेवा करण्याचा संकल्प केला. दरम्यान पत्रकारिता करत असताना अनेक ज्येष्ठ नेत्यांच्या मुलाखती घेतल्या होत्या. आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू खाशाबा जाधव यांना भारतरत्न मिळावा, त्यांच्या जन्मगावी आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल उभारावे आणि त्यांचा जयंती दिवस राज्यात क्रीडा दिन म्हणून साजरा करावा, यासंदर्भात आयबीएन लोकमत चॅनलवर प्रसारित केलेल्या त्यांच्या बातमीवर थेट राज्य विधानसभेत चर्चा झाली होती. एकेकाळी चिवटे लोकांच्या मुलाखती घेत होते. मात्र आज चिवटेंच्या रूग्णसेवेतल्या कामामुळे त्यांची मुलाखत घेण्यासाठी मुंबई आणि ठाण्यातले मराठी, हिंदी चॅनलचे प्रतिनिधी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या कार्यालयात येत असतात. चिवटेंच्या एकूण कामाची दखल घेऊन राज्य सरकारच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेवर त्यांची सदस्य म्हणून नियुक्ती झाली.

**सीमाभागात मदत आणि चळवळ**

या टीम स्पिरीटमुळे मदत कक्षाच्या रुग्णसेवेची कीर्ती राज्यासह बेळगावपर्यंत पोचलीय. एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार कोरोना पेशंटसाठी दहा ऑक्सिजन कॉन्संट्रेटर चिवटे यांनी स्वतः बेळगावला जाऊन तिथल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले. बेळगाव इथल्या एका पंधरा दिवसांच्या बाळावर हृदय शस्त्रक्रिया करण्याची गरज होती. तेव्हा मदत कक्षाच्या मदतीने शिवसेनेच्या ॲम्बुलन्समधून रातोरात मुंबईच्या हॉस्पिटलमधे आणून त्यावर यशस्वीरित्या उपचार करण्यात आले. मागच्या काळात बेळगावमधल्या मराठी बांधवांवर पोलिसांनी अमानुष लाठीहल्ला केला. त्याच्या निषेधार्थ तिथं राज्यातून रवाना झालेल्या शिवसेनेच्या पथकात चिवटेही सामील झाले. अन्यायाची चीड आणि न्यायाची चाड असलेल्या चिवटे यांना मराठी भाषेसह मराठी भूमिपुत्रांचाही अभिमान आहे.



**सरकारी योजनांचा फायदा**

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून कोरोना काळात फ्रंट लाईन कर्मचाऱ्यांची म्हणजेच डॉक्टर, नर्स, पोलिस, पत्रकार, सफाई कामगार यांची मोफत अँटीजन टेस्ट करून घेतली. कोरोना काळात लॉकडाऊनमुळे छोट्या आणि मध्यम उद्योगातल्या लोकांचे अतोनात हाल होऊन त्यांना दोन वेळचं अन्न मिळणं दुरापास्त झालं होतं. अशा बिकट परिस्थितीत मदतीचा हात देत रिक्षा चालक, घरकाम करणाऱ्या महिला, डबेवाले, तृतीयपंथी यांना अन्नधान्य आणि अन्य जीवनावश्यक वस्तूंचं मोफत वाटप करण्यात आले. अपंगांवर लॉकडाऊन काळात उपासमारीची पाळी येऊ नये यासाठी त्यांनाही जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले. शिवाय, कोरोनाच्या आणि इतर आजारांच्या खर्चिक उपचारासाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या योजना आणि खासगी ट्रस्टचा पैसा गरजूंपर्यंत पोचवण्याचे कामही शिवसेना वैद्यकिय कक्षातून होते. यात प्रामुख्याने प्रधानमंत्री सहाय्यता निधी, श्री सिद्धिविनायक ट्रस्ट, लालबागचा राजा ट्रस्ट, टाटा ट्रस्ट, कारो ट्रस्ट, चाईल्ड हेल्थ फाऊंडेशन, जय गणेश ट्रस्ट अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. इतकेच नाही तर, आनंद दिघे यांनी स्थापन केलेल्या जय अंबे माँ ट्रस्ट' आणि डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या माध्यमातून एकनाथ शिंदे थेट रुग्णांसाठी निधी उपलब्ध करून देतात.त्यामुळे त्यांच्यात जीवन जगण्याची नवी उमेद निर्माण होत असते. या सगळ्या योजना योग्य व्यक्तीपर्यंत पोचवण्यासाठी चिवटे हे कक्षाचे प्रमुख या नात्याने निरंतर प्रयत्नशील असतात. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षात सुमारे १५ हजारपेक्षा जास्त शस्त्रक्रिया केल्यात. त्यात कॅन्सर, ब्रेन ट्युमर, किडनी, लिव्हर इन बोनम्यारो ट्रान्सप्लांट, बायपास, मोतीबिंदू, एजिओप्लास्टी, कोकलीयर इमप्लांट, लहान मुलांच्या हृदयाला असलेल्या छिद्रांचे ऑपरेशन अशा शस्त्रक्रियांचा समावेश आहे.

**चिवटेंची कोरोनावर मात**

आजवर मदत कक्षाच्या माध्यमातून ११० पेक्षा जास्त महाआरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली असून त्यात ४ लाख ५० हजारहून जास्त नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. शिवाय ठाणे शहरात रिक्षा चालकांसाठी स्वतंत्र आरोग्य शिबीर आयोजित करून मोफत डोळे तपासणी आणि चष्मा वाटप करण्यात आले. कोरोनाशी दोन हात करण्यासाठी चिवटेंनी आपलं वैद्यकीय मदत कक्ष लोकांच्या सोयीसाठी २४ तास सुरू ठेवलंय. तिथला प्रत्येक कर्मचारी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून रुग्णांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना आवश्यक ती सर्व माहिती देत असतात. कुठल्या रुग्णाने कोणत्या हॉस्पिटलमध्ये दाखल व्हावं, त्यांना गरज भासल्यास रुग्णवाहिकेची तातडीने सोय करणं तसंच ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर आदी ठिकाणच्या रुग्णांना हॉस्पिटलची माहिती देणं, त्यांना बेड, वेंटिलेटर, ऑक्सिजन उपलब्ध करून देणं अशी कामं ही मदत कक्षाची टीम अहोरात्र करत असते. दरम्यान चिवटेंना कोरोनाची लागण झाली होती. पण त्याला भीक न घालता, त्यांनी सहजपणे मात केली.




**प्रत्येक गरजूपर्यंत पोचायचंय**

राज्याच्या सीमा लांघून केरळ राज्यात महापुराने पीडित झालेल्या लोकांसाठीही कक्षाकडून आरोग्य शिबिरं आयोजित करण्यात आली. तिथं सुमारे ७५ हजार लोकांची मोफत वैद्यकीय तपासणी केली गेली. त्यावर पाच कोटी रुपये खर्च करण्यात आले. मंगेश चिवटे यांनी आता आपल्या कामांचा विस्तार करण्याचा निर्धार केलाय. रुग्णसेवेसह अन्य सामाजिक सेवा करण्यात रस दाखवला. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मतदारसंघात नुकत्याच उद्भवलेल्या तौक्ते चक्रीवादळामुळे कल्याण, अंबरनाथ, मलंगगड आदी ठिकाणी घरांची मोठी पडझड होऊन छताचे पत्रे उडाले. या पार्श्वभूमीवर मदत कक्षाच्या वतीने नुकसानग्रस्तांना पत्रे वाटून दिलासा दिला.

शिवराज्याभिषेक दिनी चिवटेंच्या नेतृत्वाखाली मदत कक्षाची टीमने रायगड किल्ल्यावर प्रस्थान करून तिथल्या गार्ड आणि सुरक्षा रक्षकांना गणवेश, जॅकेट्स, बुट, ट्रेकिंग, खुर्च्या असं साहित्याचं खासदार छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती शहाजी राजे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. आज रुग्णसेवेचे त्यांचे काम राज्यातल्या २० जिल्ह्यांमधे पोचलंय. मदतकक्षाच्या रुग्णसेवेचा विस्तार लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात पसरून गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोफत वा अल्प दरात वैद्यकीय सेवा उपलब्ध होईल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

# शिक्षणाचा खेळखंडोबा का झाला?

शिक्षणानामा

**डॉ.अ.ल.देशमुख**

कुतूहल, उत्सुकता, प्रयोग करून पाहणं, निरीक्षण करणं, वेगवेगळ्या गोष्टीतले सहसंबंध शोधून काढणं अशा सगळ्या कृतींचा आणि मेंदूच्या दोन बाजूंचा वापर करण्याची संधी मिळून कृतिशीलता आणि स्वप्रयत्नाने ज्ञाननिर्मितीचा अनुभव घेणं याची अपेक्षा करणं चुकीचं वाटावं अशी परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. समाजाला ज्याप्रकारचे मनुष्यबळ हवं तसा धैर्यवान, वेगळा विचार करणारे, स्वयंनिर्णय घेणारे, कल्पक मन असलेले, सहकारी वृत्ती असणारे आणि संवेदनशील मनुष्यबळ शिक्षण व्यवस्था देत नाही हे उघड आहे. शिकणं याचा अर्थ केवळ लेखी परीक्षेसाठी प्रश्नोत्तरं पाठ करणं आणि ती उत्तरपत्रिकेत लिहून मोकळं होणं इतकाच उरलाय.

**२१ व्या शतकातली कौशल्यं**

२१ व्या शतकात ही इतकी मर्यादित शिदोरी घेऊन आपली युवा पिढी वाटचाल करू शकणार नाही. राष्ट्रीय विकासाला समर्थ ठरणार नाही. जागतिक स्पर्धेत टिकाव धरू शकणार नाही. आजच्या शिक्षणाकडून अपेक्षा वेगळ्या आहेत.

थोडासा विचार केला तर लक्षात येईल की, आज शाळेमधून नुसती माहिती मिळवणं आणि ती पाठ करणं एवढं पुरेसं नाही; तर तिचा वापर कसा करणार हे महत्त्वाचं आहे. एका क्लिकने जगातल्या माहितीचा सागर समोर येत असलेल्या काळात या माहितीचा वापर कसा करून घ्यायचा हे जमलं पाहिजे. शिक्षणामधून विद्यार्थ्यांना हे शिकवलं पाहिजे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे माणूस कमी वेळात काम उरकू शकतो. त्यामुळे आपल्याजवळ रिकामा वेळ खूप असणार आहे. या वेळेचा सदुपयोग समाजहितासाठी कसा करायचा हे कौशल्य शाळेच्या दिवसांतच शैक्षणिक प्रक्रियेतून शिकवलं जाण्याची गरज आहे.

**मानसशास्त्रीय दृष्टिकोनाची गरज**

स्वातंत्र्यप्राप्तीपासून आपण फक्त विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास एवढ्यावरच लक्ष केंद्रित केलेलं आहे. त्यामुळे विद्यार्थी काही प्रमाणात बौद्धिक साक्षर होतो; पण दैनंदिन जीवनाला सामोरं जाण्यासाठी तो कमकुवत राहतो ही वस्तुस्थिती आहे. वागणं, बोलणं, समाधानी राहणं, परस्पर सामंजस्य, इतरांबरोबर जुळवून घेणं, इतरांचे ऐकणं, नकार पचवणं, संकटाला धैर्याने सामोरं जाणं, शिस्त, आदरभाव पाळणं, चांगल्या सवयी विचार, छंद अवगत करणं यात आपले विद्यार्थी कमी पडताना दिसतात. या सर्व गोष्टींमधे त्यांची मानसिकता बऱ्याच अंशी नकारात्मक झालेली आहे. शिक्षणामधून ती आपल्याला सकारात्मक करता येईल का? त्यादृष्टीने काही प्रयत्न करता येतील का? याचा विचार करणं गरजेचं आहे. खरं म्हणजे शिक्षणाचा पायाच मुळी मानसशास्त्र आहे. पण त्याचीच परवड आज झालेली आहे. शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर आपल्याला मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अनुभव दिले पाहिजेत. याची नितांत आवश्यकता आहे.



**मूल्यमापनाचं तंत्र विकसित करावं**

शाळांमधून विद्यार्थी वर्ष पूर्ण झालं की पुढच्या वर्षात जाईल. पालकांनी आपापल्या मुलांचं मूल्यमापन या मूल्यमापन केंद्रावर जाऊन करून घ्यावं. यामधून एक प्रकारे मूल्यमापन पारदर्शकपणे होईल आणि विद्यार्थी सर्वांगीण विकासाच्या बाबतीत कितपत विकसित झालाय हे समजून येईल. मूल्यमापन केंद्रांनी मात्र त्यांचा दर्जा आणि गुणवत्ता टिकवण्यासाठी जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा, शिक्षणतज्ज्ञांचा, नवनवीन कल्पनांचा वापर करून मूल्यमापनाचे तंत्र विकसित करावे. मग ते ऑफलाईन असो वा ऑफलाईन. यामुळे परीक्षा हा वाईट शब्द शिक्षणातून आपोआप हद्दपार होईल आणि आज जी समस्या उद्भवलेली आहे ती उद्भवणार नाही. मूल्यमापन हा शिक्षणाचा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्यामुळे मूल्यमापन केंद्राने जेवढी जास्तीत जास्त गुणवत्ता प्राप्त करता येईल, तेवढी करावी.

**तर शिक्षणाचा भविष्यकाळही उज्ज्वल**

२१ व्या शतकामधे आपल्याकडे मुक्त शिक्षणाचा किंवा गृहशाळेचा विचार करावा लागेल. गृहशाळा म्हणजे प्रत्येक घरीच व्हायला पाहिजे असं नाही तर गावात वेगवेगळी अभ्यास केंद्रं तयार व्हावीत. समाजसेवक, सामाजिक संस्था या समाजातल्या घटकांनी यात लक्ष घालून कमीत कमी पैशात ही अभ्यास केंद्रं चालवावीत. आता अगोदरची आणि नवीन पद्धती यांचा समतोल साधून आपल्या मुलांना त्यांचं भविष्य सुरक्षित, विकसित, उज्ज्वल करणारं शिक्षण देण्याची जबाबदारी आपल्यावर आलीय. यासाठी आणखी आयोग आणि समित्यांची नेमणूक न करता ही आपली सामूहिक जबाबदारी आहे असं मानून काम केल तर शिक्षणामधून आपला भविष्यकाळ उत्तम आहे.

(समाप्त)

# खरात आडगावात कांडे गवतापासून जैवइंधन प्रकल्प

## दोन हजार बेरोजगारांसाठी संधी; १३ एकरांवर साकारणार प्रकल्प

प्रतिनिधी

माजलगाव : गुरांच्या चाऱ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कांडे गवतापासून जैवइंधन तयार होणार आहे. शेतीपूरक उद्योगाला चालना मिळावी म्हणून केंद्र सरकारने एमसीएल अंतर्गत तालुक्यात प्रकल्प दिलेले आहेत. त्यामध्ये माजलगाव तालुक्यात दीपअर्चना ॲग्रोप्रोड्युसर कंपनी आणि एमसीएल यांच्या संयुक्त विद्यमाने लवकरच खरात आडगाव येथे १३ एकर जमिनीवर हा जैवइंधन प्रकल्प उभारला जाणार असल्याची माहिती माजलगाव येथील युवा उद्योजक सौरभ जाधव यांनी दिली.

या प्रकल्पामुळे तालुक्यातील २ हजार





बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. शेतकऱ्यांना स्वतःच शेती करत कॉन्ट्रॅक्ट फार्मिगचा अनुभव घेता येणार आहे. भविष्यात या प्रकल्पामुळे स्वस्तात गॅसदेखील उपलब्ध होणार आहे. माजलगाव तालुक्यातील खरात आडगावातील तेरा एकर जमिनीवर हा प्रकल्प उभारला जाणार आहे. एमसीएल ही कंपनी ८० टक्के तर माजलगाव येथील दीपअर्चना ग्रोप्रोड्युसरची १० टक्के भागीदारी असणार आहे. म्हणजे १० टक्के रक्कम ही शेअर्सच्या माध्यमातून उभी राहणार आहे. जवळपास ५० कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे.

यापैकी पाच कोटींचे शेअर्स हे शेतकऱ्यांना विकले जाणार असल्याचे डीएसीचे चेअरमन दीपक जाधव यांनी सांगितले. जैवइंधन निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल तालुक्यातील शेतकऱ्यांकडून घेतला जाणार असून तो करार पद्धतीचा वापर करून उत्पादित केला जाणार आहे. यासाठी कांडे गवत लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले जाणार आहे. चार महिन्यांचे हे पीक असून वर्षभरात चार वेळा याचे उत्पन्न मिळते. या प्रकल्पाच्या माध्यमातून तालुक्यात दीड ते दोन हजार बेरोजगारांना कंपनीच्या विविध विभागामार्फत रोजगार उपलब्ध होणार आहे. प्रकल्प शेतकऱ्यांपाठोपाठ बेरोजगार युवकांसाठी देखील वरदान ठरणार असल्याचे सौरभ जाधव यांनी सांगितले. जैवइंधन प्रकल्पासाठी ५०० रूपये प्रतिशेअरप्रमाणे शेअर विक्री होत आहे. तालखेड, नित्रुड, गंगामसला, पात्रुडसह इतर ग्रामपंचायतीच्या ठिकाणाहून शेअर विक्रीची व्यवस्था केली. प्रकल्पासाठीचेअरमन दीपक जाधव, युवा उद्योजक सौरभ जाधव, संचालक अरूण राऊत काम पाहत आहेत.

### प्रत्येक ग्रामपंचायतीत एमव्हीपी सेंटर

जानेवारी ते मार्च २०२२ पर्यत हा जैवइंधन प्रकल्प सुरू करण्यासाठीचे प्रयत्न सुरू आहे. माजलगाव तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ठिकाणी एमव्हीपी सेंटर उभारले जाणार आहे. प्रकल्प आणि शेतकरी तसेच ग्राहक यांच्यात दुवा साधण्याचे काम या सेंटरकडून होणार आहे. कांडे गवत लागवडीसाठी करार पद्धती वापरली जाणार आहे. यात खर्च फार कमी प्रमाणात असून उत्पादित झालेल्या कांडे गवताची १ हजार रूपये प्रतिटनप्रमाणे खरेदी कंपनी करणार असल्याची माहिती सौरभ जाधव यांनी दिली.

# बीड पीकविमा पॅटर्नची दिल्लीत दखल

## मात्र लाभार्थी शेतकरी गोत्यात!

प्रतिनिधी

बीड : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गेल्या मंगळवारी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन बीडचे पीकविमा पॅटर्न सगळीकडे राबवावे, अशी विनंती केली. त्यामुळे बीडचे पीकविमा मॉडेल चर्चेत आले आहे. दरम्यान, बीडच्या पीकविमा पॅटर्नची दिल्ली दरबारी दखल घेतली असली तरी लाभार्थी शेतकरी मात्र गोत्यात आल्याचे चित्र दिसत आहे.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि निसर्गाचा असमतोल यामुळे प्रधानमंत्री पीकविमा योजनेत राज्यात सर्वाधिक बीड जिल्ह्यातील शेतकरी सहभागी होतात. त्यामुळे बीडचा गौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१९ साली केला होता. मात्र, शेतकऱ्यांना मिळणारा नगण्य परतावा लक्षात घेऊन विमा कंपन्यांची नफेखोरी टाळण्यासाठी बीड जिल्हा प्रशासनाने विशेष आदेश पारीत केले. बीड जिल्हा प्रशासनाने राबविलेले हे मॉडेल सर्वत्र लागू करावे, अशी मागणी मुख्यमंत्री ठाकरे यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री अशोक चव्हाण यांच्या शिष्टमंडळाने पंतप्रधानांकडे केली. कंपनी तोट्यात जात असल्याची ओरड करत २०१९च्या खरीप व रब्बी या दोन्ही हंगामात बीड जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांचा विमा घेण्यास कुठलीही पीकविमा कंपनी तयार नव्हती. त्यामुळे २०२०च्या खरीप हंगामात बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्य शासनाच्या माध्यमातून केंद्राकडे सतत पाठपुरावा करून भारतीय विमा कंपनीशी तीन वर्षाचा करार करत नवा पॅटर्न बीड जिल्ह्यात राबवला. हा पॅटर्न राज्यात केवळ बीडपुरताच मर्यादित होता. २०२० खरीप हंगामात भारतीय कृषी विमा कंपनीकडे १७ लाख ९० हजार शेतकऱ्यांचे ६० कोटी तसेच केंद्र व राज्य मिळून ७९८ कोटी रुपये भरणा केला होता. मात्र, त्यापैकी फक्त २० हजार ५३९ शेतकऱ्यांना १३ कोटी ४६ लाख रुपये भरपाई देण्यात आली. त्यामुळे मॉडेल २ नुसार कंपनीला जळपास १५९ कोटीचा नफा झाला आहे. सुमारे ६२५ कोटी रुपये शासनाकडे परत केले जाणार आहेत. मात्र, अतिवृष्टीमुळे चार लाख ३२ हजार शेतकरी बाधित झाले होते. त्यांच्या नुकसानीचा पंचनामा कृषी व महसूल विभागाने केला होता. त्यामुळे शासनाला ही रक्कम परत न करता शेतकऱ्यांना जिल्हा प्रशासनाच्या पंचनाम्याप्रमाणे विमा रक्कम अदा करावी, अशी मागणी केली जात आहे.

### ...तर राज्य शासन पाच कोटी अदा करेल

पीकविमा कंपनीस जमा केलेला हप्ता १०० कोटी असेल आणि देय नुकसानभरपाई ११५ कोटी असल्यास भारतीय कृषी विमा कंपनी ११० कोटी नुकसानभरपाई अदा करेल, तर यासाठी राज्य शासन पाच कोटी अदा करेल. दुसऱ्या परिस्थितीमध्ये जमा विमा रक्कम १०० कोटी असेल व देय नुकसानभरपाई ७५ कोटी असल्यास भारतीय कृषी विमा कंपनी ७५ कोटी नुकसानभरपाई अदा करेल, तर २० कोटी स्वत:कडे ठेवेल. पाच कोटी राज्य शासनास परत करेल. अशा प्रकारचा पॅटर्न गेल्या वर्षीपासून राबविण्यात आला होता.



# आयएमएच्या डॉक्टरांचे काळ्या फिती लावून कामकाज

## डॉक्टरांवरील हल्ल्यांविरोधात राष्ट्रीय निषेध कार्यक्रमात सहभाग

प्रतिनिधी

माजलगाव : कोरोना काळात जीवाची बाजी लावून रूग्णसेवा बजावत असलेल्या डॉक्टरांवर देशाच्या कानाकोपऱ्यात हल्ले होत आहेत. त्याविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशनच्या राष्ट्रीय स्तरावर शुक्रवारी निषेध दिवस पुकारला असून इंडियन मेडिकल असोसिएशनच्या माजलगाव शाखेचे डॉक्टर्सनी काळ्या फिती लावून या निषेध कार्यक्रमाला दि.१८ जून रोजी आपला पाठिंबा दर्शवित तहसीलदार यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले.

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यात डॉक्टरांवर हल्ले होत आहेत. या घटनांच्या निषेधार्थ आयएमए हा राष्ट्रीय निषेध दिन पाळत असून 'जीव वाचवणाऱ्या डॉक्टरांचे रक्षण करा' असे या कार्यक्रमाचे घोषवाक्य आहे. यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशन माजलगाव शाखेचे अध्यक्ष डॉ.शामसुंदर काकाणी म्हणाले, मागील दीड वर्षापासून डॉक्टर करत असलेली रूग्णसेवा सुरूच आहे मात्र डॉक्टरांवरील भ्याड हल्ल्यांबाबत निषेध व्यक्त करतोत आणि आता सहन करणार नाहीत. शुक्रवारी निषेध दिनाचे औचित्य म्हणून आयएमएचे डॉक्टर काळ्या फिती, काळी मुखपट्टी लावून काम करत आहेत. माध्यमे आणि समाज माध्यमांच्या मदतीने डॉक्टरांची बाजू समाजापर्यंत पोहोचविली असल्याचेही डॉ.काकाणी यांनी म्हटले आहे. तसेच यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे सहसचिव डॉ.शिवाजी काकडे म्हणाले, सर्व रूग्णालयांमध्ये सुरक्षा वाढवण्यात यावी. डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला करणाऱ्यांविरोधातील गुन्हे जलदगती न्यायालयांमध्ये चालवले जावेत. आरोपींना कठोर शासन व्हावे, या मागण्या आयएमए राष्ट्रीय स्तरावर करत आहे.

त्या मागण्यांचा पुनरुच्चार आम्ही सर्व स्तरांमध्ये करत आहोत असेही डॉ.काकडे म्हणाले. यावेळी तहसीलदार कार्यालयात नायब तहसीलदार अशोक भंडारी यांच्याकडे विविध मागण्यांचे निवेदन डॉक्टर्सनी दिले. यावेळी डॉ.शिवाजी काकडे, डॉ.शामसुंदर काकाणी, डॉ.शंकर जुजगर, डॉ.यशवंत राजेभोसले, डॉ.विजय खळगे, डॉ.सचिन डक, डॉ.दीपक कोडगीरकर, डॉ.सुशिल मुगदिया, डॉ.राजेश रूद्रवार, डॉ.स्वानंद कुलकर्णी, डॉ.प्रविण राठोड, डॉ.परम राठोड, डॉ.राहुल लड्डा यांची उपस्थिती होती.

# मोगऱ्यात 'मुन्नाभाई'

## बोगस डॉक्टरवर दिंद्रुड पोलीसांची कारवाई

प्रतिनिधी

माजलगाव : कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना रूग्णांची तपासणी करून त्यांना औषधोपचार करत नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या डॉक्टरवर शुक्रवारी कारवाई करण्यात आली. तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून इंजेक्शन, औषधी जप्त करत दिंद्रुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश विवेक विश्वास असे गुन्हा दाखल झालेल्या डॉक्टरचे नाव आहे.

माजलगाव तालुक्यातील मोगरा गावात एक व्यक्ती कोणतीही वैद्यकीय पदवी, परवानगी नसताना रूग्णांवर उपचार करीत होता. याची माहिती बीडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मिळाली. यामुळे त्यांनी तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांना संबंधित डॉक्टरवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

वरिष्ठांच्या सूचनेवरून तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.मधुकर घुबडे यांनी गंगामासला प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.संदीप बट्टुळे, नायब तहसीलदार अशोक भंडारे, आरोग्य सहायक पी.एम.जगनाडे यांच्यासह बोगस डॉक्टर विश्वास याच्या खोलीची झडती घेतली. यावेळी तो रूग्णांवर उपचार करताना आढळून आला. त्याला कागदपत्रांची मागणी केली असता ते नसल्याचे त्याने सांगितले.

याठिकाणी काही अलोपॅथी औषधी, गोळ्या, इंजेक्शन, रूग्ण तपासणीचे साहित्य असे ३५ हजार रूपयांचे साहित्य जप्त करून डॉ.विश्वास विरुद्ध दिंद्रुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### काँग्रेसतर्फे 'संकल्पदिन' साजरा



माजलगाव : तहसिल कार्यालयासमोर काँग्रेसचे अनुसुचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वाखाली जाचक कृषी कायद्यांची होळी करण्यात आली. दुसऱ्या छायाचित्रात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात काँग्रेसचे शहराध्यक्ष शेख रशिद यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.



# डीसीसी बँक प्रशासकावर लाचखोरीची कारवाई

प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यात लाचखोरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. बीड तालुक्यातील खालापुरी येथील डीसीसी बँकेच्या शाखेत लाच मागितल्याप्रकरणी प्रशासकावर शनिवारी कारवाई करण्यात आली. सुंदर भागवतराव बांगर (प्रशासक, कॅशिअर) असे लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे.

तक्रारदाराच्या संस्थेचे लेखापरीक्षण केले होते. त्याच्या धनादेशावर स्वाक्षरी करण्यासाठी बांगर याने पंधरा हजार रूपये लाचेची मागणी केली होती. लाचेची मागणी केल्याप्रकरणी बांगरवर कारवाई करण्यात आली. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक डॉ.राहुल खाडे, अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक बाळकृष्ण हानपुडे, पोलीस निरीक्षक रविंद्र परदेशी यांनी केली. या कारवाईने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

# संतोष गर्जेंकडे १११ अनाथांचे पालकत्व

## बीड जिल्ह्यातील प्रेरणादायी प्रकल्प; मुलांना दिले जातात शिक्षणाबरोबरच स्वावलंबनाचे धडे



प्रतिनिधी

गेवराई : ज्या चिमुकल्या मुलांचे जगाच्या पाठीवर कुणीच नाही, ज्यांच्या आयुष्यात एखाद्या अपघाताने आई-वडिलच हिरावून घेतले, अशा अनाथ मुलांचा सांभाळ बीडमध्ये सहारा अनाथालय संस्थेच्या माध्यमातून संतोष गर्जे हा तरूण करत आहे. विशेष म्हणजे, संतोष याची पत्नी प्रीती संतोष गर्जे हिने देखील या कामात स्वतःला वाहून घेतले आहे. आजघडीला संतोष यांनी सहारा अनाथालयाच्या माध्यमातून १११ मुलांचे पालकत्व स्वीकारले आहे. गेल्या रविवारी झालेल्या जागतिक 'फादर्स डे'च्या निमित्ताने संतोष गर्जे यांच्या कार्याचा आढावा वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.

गेवराईपासून पाच ते सहा किलोमीटर अंतरावर सामाजिक कार्यकर्ते संतोष गर्जे यांचे सहारा अनाथालय आहे. येथे आजघडीला १११ अनाथ मुले वास्तव्य करतात. वयाच्या अठराव्या वर्षी घरातल्याच एका घटनेमधून संतोष गर्जे यांनी प्रेरणा घेऊन अनाथ मुलांसाठी काहीतरी करायचे, अशी खूणगाठ मनाशी बांधली व आज संतोष गर्जे हे १११ अनाथ मुलांचे बाप आहेत. संतोष गर्जे हा ऊसतोड कामगारांचा मुलगा आहे. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची, साधारणत: वीस-बावीस वर्षापूर्वी संतोष गर्जे यांच्या विवाहित बहिणीचे निधन झाले. तिच्या छोट्या मुलाला संतोषचे वडील घरी घेऊन आले. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने आई-बापाचे छत्र हरवलेल्या भाच्याचे हाल संतोष यांनी डोळ्यांनी पाहिले होते. ते दुःख पाहून त्यांच्या मनात विचार आला की, समाजातील अशा अनाथ बालकांचे आयुष्य किती खडतर आहे. तेव्हाच त्यांनी ठरवले की, आपण या पुढचे सर्व आयुष्य अनाथ मुलांसाठी काम करायचे व त्यांनी वयाच्या १९ व्या वर्षी गेवराई येथे सहारा अनाथालय सुरू केले.

### अनेक समाजातील दानशूर व्यक्तींची होते मदत



गेवराई येथील संतोष गर्जे यांच्या अनाथालयात दाखल असलेल्या मुलांना ना आई आहे, ना वडिलांचे छत्र. सहारा अनाथालयामध्ये दाखल असलेल्या मुलांमध्ये कोणी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचा मुलगा आहे, तर काही मुलांची आई देह व्यवसाय करते, मग मुलाला बरोबर घेऊन जाणार कसे? म्हणून सोडून दिलेल्या मुलांचे संतोष गर्जे सांभाळ करत आहेत. मुलांच्या जेवणापासून ते राहण्यापर्यंतचा सर्व खर्च संतोष गर्जे हे करतात. यासाठी त्यांना अनेक समाजातील दानशूर व्यक्तींची मदत होते. संतोष गर्जे यांच्या सहारा अनाथालयात आलेल्या मुलांना चांगले शिक्षण दिले जाते. भविष्यात तो मुलगा समाजात उभा राहू शकेल एवढी जबाबदारी सहारा अनाथालय घेते. मागील १७ वर्षात सहारा अनाथालयात राहून शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभा राहिलेली अनेक मुले आज समाजात काम करत असल्याचे मोठ्या अभिमानाने संतोष सांगतात. महाराष्ट्रातील सतरा जिल्ह्यांमधील अनाथ मुले सहारा अनाथालयामध्ये राहतात. संतोष गर्जे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. 'फादर्स डे' च्या निमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाला सलाम! मागील वर्षभरात संतोष गर्जे हे अनेक वेळा संकटात सापडले. सहारातील १११ मुलांची सर्व जबाबदारी संतोष गर्जे यांच्यावर आहे. समाजातील दानशूर व्यक्तींनी सहारा अनाथालयाला मदत करावी, असे आवाहन संतोष गर्जे यांनी केले.

# भरधाव वाळूच्या टिप्परने घेतला युवकाचा बळी

## लहामेवाडी फाट्यावर अपघात;एक जखमी

प्रतिनिधी

माजलगाव : वाळू वाहतूक करणाऱ्या भरधाव टिप्परने दुचाकीला दिलेल्या धडकेत एक युवक ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी रात्री साडेनऊच्या वाजण्याच्या सुमारास खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर लहामेवाडी फाट्याजवळ घडली.



माजलगाव तालुक्यातील आनंदगाव येथील रहिवासी तुकाराम खंडोबा गायके (वय २०) व बाबूराव बालासाहेब गायके (वय ३२) हे काही कामानिमित्त नित्रूड येथे गेले होते. काम उरकून रात्री नऊ वाजेनंतर दुचाकीवरून (एमएच १२ बीएल ४७९८) गावाकडे परतत होते. खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर माजलगावकडून वाळू घेऊन टिप्पर येत होता. लहामेवाडी फाट्यावर टिप्परने जोराची धडक दिल्याने, झालेल्या अपघातात तुकाराम खंडोबा गायके याच्या म डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने तो जागीच ठार झाला.

त्याच्यासोबत असणारा बाबुराव बालासाहेब गायके हा गंभीर जखमी झाला आहे. दरम्यान, जखमीवर बीड येथील शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

अज्ञात वाळू टिप्परची पोलिसांकडून माहिती घेतली जात आहे. प्रकरणाचा तपास सपोनि निलेश ईधाते करत आहेत.

# दुचाकी चोरीचे वाढले प्रमाण

## नागरिकांनी योग्य काळजी घ्यावी : धनंजय फराटे यांचे आवाहन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरात दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले असून याबाबत नागरिकांनी दक्ष रहावे आणि योग्य काळजी घ्यावी, असे आवाहन माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी केले आहे.

गेल्या काही महिन्यांपासून माजलगाव शहरात मोटरसायकल चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. या चोरीच्या घटना रोखण्यासाठी मोटरसायकल चालकांनी आपल्या मोटरसायकलच्या पुढच्या चाकाला व्हील लॉकचा वापर करावा असेही मत पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी केले आहे. मागील सहा महिन्यांच्या कालावधीत बीड जिल्ह्यासह माजलगाव शहरात दुचाकी वाहने चोरी होण्याच्या घटना वाढत आहेत. विशेषतः होंडा शाईन व पॅशन प्रो या मोटारसायकल चोरांकडून लक्ष्य केल्या जात आहेत. मोटारसायकलला असलेले



पारंपरिक हॅण्डल लॉक बनावट चावीने उघडून गर्दीच्या ठिकाणावरून दुचाकी चोरी होत आहेत. त्यामुळे वाहनांच्या अतिरिक्त सुरक्षेसाठी दुचाकीला व्हील लॉक लावणे गरजेचे आहे. हँडल लॉक व व्हील लॉक या दुहेरी लॉकिंगमुळे वाहन चोरीला प्रतिबंध होण्यास मदत होणार आहे. तरी सर्व दुचाकी धारकांनी विशेषतः होंडा शाईन व पॅशन प्रो मोटारसायकल धारकांनी व्हील लॉक लावावे.

बाजारपेठ व रात्री घरासमोर वाहन उभे करताना न चुकता हँडल लॉक लावावे, व्हील लॉकचा वापर करावा. व्हील लॉकची किंमत दर्जानुसार प्रत्येकी ३०० व ४०० रूपये आहे. तरी सर्व वाहन धारकांनी त्याचा आवश्य वापर करावा. तसेच यामुळे जेणेकरून दुचाकी चोरीचे सत्र थांबेल असा विश्वासही पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी व्यक्त केला आहे.



## हरिभाऊ सवणे यांचे अभिष्टचिंतन!



माजलगाव : कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांचा वाढदिवसानिमित्त बाजार समितीकडून सत्कार करण्यात आला. यावेळी सभापती संभाजी शेजुळ, अच्युतराव लाटे, निळंकठराव भोसले, आसाराम घायतिडक, उध्दव फपाळ, वर्तमान माध्यम समुहाचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी आदी.

## अशोक डक यांचा बाजार समितीकडून सन्मान



माजलगाव : येथे कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांचा सत्कार करताना सभापती संभाजी शेजुळ, उपसभापती अच्युतराव लाटे, डॉ.वासिम मनसबदार, पं.स.सदस्य मिलिंद लगाडे, संचालक मंडळ आदी.

# 'घरकूल लाभार्थ्यांना मोफत वाळू द्या'

▶ प्रतिनिधी

माजलगाव : विविध योजनेतून मंजूर झालेले घरकुलांच्या बांधकामासाठी शासनाने पाच ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा करूनही याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. महसूल प्रशासनाने लाभार्थ्यांना सात दिवसांत मोफत वाळू उपलब्ध करून द्यावी नसता बुधवारी तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष ॲड.अमोल डोंगरे यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.



मागील काही वर्ष अधिकृत वाळू ठेक्याचे लिलाव न झाल्याने वाळूला सोन्याचा भाव आला होता. शासनाच्या विविध योजनेतून आर्थिक दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांना मंजूर झालेले घरकुल महागाईची वाळू घेऊन बांधणे शक्य होत नव्हते. यामुळे राज्य शासनाने या लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी परिपत्रकही काढले होते. याला अडीच वर्ष उलटूनही मोफत वाळू देण्याची अंमलबजावणी अद्याप आली नाही.

सद्यःस्थितीत पाच ब्रास वाळू घेण्यासाठी तब्बल ४० हजार रूपये करण्यात मोजावे लागत आहेत. घरकुल बांधण्यासाठी शासनाकडून मिळणारे अनुदान तुटपुंजे असून त्यातून वाळूसाठी एवढा खर्च करणे लाभार्थ्यांना परवडत नाही. यामुळे महसूल प्रशासनाने २०१९ ते २०२१ तीन वर्षात मंजूर झालेल्या घरकुलच्या लाभार्थ्यांना सात दिवसात मोफत वाळू उपलब्ध करून द्यावी. न दिल्यास तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष ॲड.अमोल डोंगरे यांनी उपविभागीय अधिकारी, तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात दिला आहे. यावेळी अरविंद लोंढे, चंदनलाल बनगे, हरिभाऊ साळवे, जालिंदर साळवे आदी उपस्थित होते.

# प्रज्ञा शोधमध्ये श्री सिध्देश्वर विद्यालयाचे विद्यार्थी चमकले

▶ प्रतिनिधी

माजलगाव : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, आयोजित राष्ट्रीय प्रज्ञा शोध (एनटीएस) परीक्षेत येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश प्राप्त केले आहे. या परीक्षेत एकूण २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कु.आकांक्षा आळसे १२५, तर कु.तनया थेटे हिने १२२ गुण मिळवून मोठे यश संपादन केले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना अतुल मुगळीकर, लक्ष्मीकांत बुगदे, राहूल नाईक यांचे मार्गदर्शन लाभले तसेच तांत्रिक मार्गदर्शन मुकेश काळे यांचे मिळाले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर, उपाध्यक्ष राधेश्याम लोहिया, कार्यवाह नितीन शेटे, सहकार्यवाह प्रा.चंद्रकांत मुळे, डॉ.हेमंत वैद्य, सौ.कल्पनाताई चौसाळकर, श्री सिध्देश्वर



कु.आकांक्षा आळसे



कु.तनया थेटे

शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष प्रकाश दुगड, पालक सुनिल लोढा, शालेय समितीचे अध्यक्ष प्रेमकिशोर मानधने, मुख्याध्यापक बाबुराव आडे, उपमुख्याध्यापक विजयेंद्र चौधरी, पर्यवेक्षक उमेश थाटकर , दिलीप चव्हाण, मिलिंद वेडे यांनी अभिनंदन केले आहे.

# अभिप्रिया इबितेचे राष्ट्रीय प्रज्ञाशोधमध्ये प्राविण्य

▶ प्रतिनिधी

माजलगाव : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत केसापुरी वसाहत येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थीनी अभिप्रिया इबिते उत्तीर्ण झाली.



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने डिसेंबर २०२० मध्ये इयत्ता दहावीसाठी आयोजित या राज्यस्तरीय परीक्षेसाठी मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते, मोरेश्वर मसलेकर, बजरंग बनसोडे, उत्तम वाले आणि लक्ष्मीकांत भोले यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष ड.एस. आर.शर्मा, कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के. देशमुख, उपाध्यक्ष ड.एस.बी. मुळी, शालेय समितीचे अध्यक्ष ड.आर.डी. भिलेगावकर, संचालक ड.ए.एम. मोगरेकर, आर.बी. देशमुख, जी. एल. जोशी, ॲड.सुलभाताई देशमुख, शिरीष देशमुख, डॉ.सचिन देशमुख, के.एल.मोताळे यांनी शुभेच्छा दिल्या.

# 'श्री सिद्धेश्वर'मध्ये वाचन दिन साजरा

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात दि १९ जून शनिवार रोजी वाचन दिन साजरा करण्यात आला आहे.या कार्यक्रमासाठी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, प्राचार्य डॉ.महेश देशमुख, उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, प्रा.युवराज मुळये, प्रा.संतोष लिंबकर, ग्रंथपाल प्रा.सुरेश बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक आणि सुत्रसंचलन प्रा सुरेश बनसोडे यांनी केले. त्यांनी वाचन संस्कृती वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांनी सतत ग्रंथालयाचा लाभ घेणे आवश्यक आहे असे म्हटले.

## 'द कुटे ग्रुप'च्या अर्चना कुटे यांचा गौरव



बीड : द कुटे ग्रुपच्या गुड मॉर्निंग डेअरी प्रोडक्ट्स शुभारंभाप्रसंगी कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक अर्चना कुटे यांचा गौरव करताना माजलगावचे सेल्स एक्झिक्युटिव्ह ऑफीसर कृष्णा कानडे.

# विद्यार्थ्यांनी गिरवले ध्यान, योगाचे धडे

## सिध्देश्वर महाविद्यालयात आर्ट ऑफ लिव्हींगचे शिबीर

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील भा.शि.प्र.संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालय आणि आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने ऑनलाईन प्राणायाम आणि ध्यान शिबिर दि.१४ जून ते १८ जून दरम्यान उत्साहात झाले. महाविद्यालयाच्या क्रीडा विभाग व आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार माजलगाव वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

पाच दिवसीय प्राणायाम व ध्यान शिबिरामध्ये महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक आणि पालक ऑनलाईन पद्धतीने झूम ॲपच्या माध्यमातून या शिबिराला उपस्थित होते. कोरोनाच्या पुढील तिसऱ्या लाटेमध्ये तरूण व युवकांच्या दृष्टीने हानिकारक ठरण्याचा दिलेला वैद्यकीय तज्ञांचा इशारा लक्षात घेता लहान मुले व तरूण यांची रोगप्रतिकारशक्ती सशक्त व सक्षम राहण्याच्या दृष्टीने त्यांचे आरोग्य सुधारणे महत्त्वाचे असल्याचे जाणून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी, बालके व प्राध्यापक कर्मचारी हे शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचे घटक असून त्यांचे आरोग्य सुदृढ राहणे महत्त्वाचे आहे. त्यांच्यामध्ये आरोग्यविषयक जाणीव जागृत व्हावी याकरिता सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या क्रीडा विभाग व आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार, माजलगाव यांनी पुढील पाच वर्षाकरिता आपसात सामंजस्य करण्याचे ठरवून या शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरार्थींना मार्गदर्शन आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराचे समन्वयक नंदकुमार शिंदे, श्रीकृष्ण शेजुळ, सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, प्राचार्य डॉ.महेश देशमुख महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.उमेश साडेगावकर यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी व प्राध्यापक तसेच समाजातील नागरिक यांच्याकरिता पाच दिवसांमध्ये प्रत्येक दिवशी स्वतंत्र तीन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये प्रशिक्षक कु.मधुरा इटके दीदी (परळी) बाळासाहेब सोनार, भास्कर दादा शिंदे, श्रीकृष्ण शेजुळ, नंदकुमार शिंदे यांनी पाच दिवसांमधील १५ सत्रातून शिबिरार्थींना शरीरात ऑक्सिजन वाढवणारे प्राणायाम, फुप्फुसाची क्षमता वाढवणारे प्राणायाम, प्रतिकारशक्ती वाढवणारे प्राणायाम व ध्यान या माध्यमातून उत्तम असे प्रशिक्षण दिले. साधकांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरेही दिली.

# आता बँकेमध्येही मिळणार सातबारा

## ५२ बँकांचा महसूल विभागाशी करार

▶ प्रतिनिधी

मुंबई : पीक कर्ज घेत असताना शेतकऱ्यांना अनेक कागदपत्र बँकेमध्ये दाखल करावी लागतात. एखादा कागद नसेल तर बँक कर्जाचे प्रकरण नाकारते. मात्र, राज्य शासनाने शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी बँकेमध्येच सातबाराचा उतारा उपलब्ध करून देण्याचे निर्देशित केले आहे.

राज्यातल्या ५२ बँकांचे महसूल विभागासोबत करार करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना बँकेतून ऑनलाईन सातबाराचा उतारा मिळणार आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी दरवर्षी नवीन उपक्रम राबवत आहे. जवळपास सर्वच प्रक्रिया ऑनलाईन झाल्याने सर्वसामान्यांना तात्काळ कागदपत्र मिळतात. बँकेकडून पीक कर्ज घेण्यासाठी शेतकऱ्यांना तलाठ्याच्या दारात जावून विविध कागदपत्र घ्यावे लागतात.

एखादा कागद नसेल तर बँका शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करतात. शेतकऱ्यांची फरफट होवू नये त्यासाठी बँकेमध्येच ऑनलाईन कागदपत्र उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातल्या ५२ बँकांची महसूल विभागासोबत करार करण्यात आले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, जनता सहकारी बँक सातारा यासह अन्य बँकामध्ये आता शेतकऱ्यांना ७/१२ चा उतारा डिजीटल स्वरूपात मिळणार आहे.










आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.